# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.07/06/2019**

बांधकाम विभाग

// गोषवारा //

**प्रकरण क्र. (13)** :- विकास कामांना आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात करावयाच्या कामाचे सन 2019-20 या वर्षातील उपलब्ध अर्थसंकल्पातील तरतूदीनुसार खालील कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| 1 | भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र. 2 मधील दळवी चाळ, टेम्पो स्टॅन्ड, साधुराम हॉटेल, आराधना इंड, भाजी मार्केट इ. येथील इंडस्ट्रीयल परिसरात गटारे व सीसी रस्ते बांधणे | रू.1,16,15,950/- | इंडस्ट्रीयल रस्ते/गटारे देखभाल दुरूस्ती व इतर कामे |

वरील कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात शिफारस आहे.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-2/DK/2019-20/MG-2

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**बांधकाम विभाग**

**मा. महासभा दि.०७/०६/२०१९**

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( २६ ) :-** शहरातील पक्षी, प्राणी यांच्यावर उपचार करणाऱ्या (जीवद्‍या) संस्थांना देखभाल दुरूस्ती करीता मानधन देणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) शांतीनगर येथे पक्षी-प्राणी यांच्यावर उपचार करण्यासाठी दवाखाना बांधण्यात आलेला असून भाईंदर पश्चिम येथे देखिल दवाखान्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदर दवाखान्यात सेवा देणाऱ्या संस्थांना दवाखान्यात चांगल्या प्रकारे सेवा देण्याकरीता मानधन दिल्यास सोयीचे होईल. सदर संस्था ह्या विहीत प्रक्रीया करून निवडण्यात येत आहेत. सदर वस्तुस्थिती सादर करण्यात येत आहे.

**(बालाजी खतगांवकर)**
**आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-3/DK/2019-20/MG-1

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

### मा. महासभा दि.07/06/2019

// गोषवारा //

**प्रकरण क्रमांक (२८)** :- बी.एस.यु.पी कामाबाबत नविन अटीशर्ती ठरविणे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत असलेल्या बी.एस.यु.पी योजनेबाबतची वस्तुस्थिती दि.26/07/2018 रोजीचा मा.महासभेपुढे सादर करण्यात आली होती. मा. महासभा दि.26/07/2018 ठराव क्र. 44 अन्वये सदर प्रकल्पातंर्गत सुरु असलेल्या जे-1 पॅकेज मधील 294 सदनिकाची इमारत, जे-3 पॅकेजमधील इमारत क्र. 02 मधील 299 सदनिका, इमारत क्र. 03 मधील 299 सदनिका, इमारत क्र. 04 मधील 299 सदनिका व इमारत क्र. 05 मधील 299 सदनिका तसेच काशिचर्च पॅकेज मधील इमारत क्र. 04 मधील 129 सदनिका अशा मिळुन 1619 सदनिकांची कामे संबधित कंत्राटदाराकडुन महानगरपालिकेच्या स्वनिधी अथवा कर्ज निधितुन पुर्ण करुन घेण्यास तसेच सदर इमारतीच्या एकुण क्षेत्राच्या 25% क्षेत्र वाणिज्य वापरासाठी अनुज्ञेय असल्याने सदर जागा विकुन सदर कामांना निधी उपलब्ध करुन देण्यास तसेच 150 कोटीपर्यंत कर्ज घेण्यास मान्यता देण्यात आली.

त्यानुसार कर्ज घेण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आल्यावर शासनाने दि.12/02/2019 रोजीच्या शासननिर्णयानुसार मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणाकडुन कर्ज घेण्यास मान्यता देण्यात आली. तदनंतर प्राधिकरणाकडे कर्ज घेण्यासाठी अर्ज करुन पाठपुरावा केल्यावर सदर कर्ज मंजुरीचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे. दरम्यानच्या काळात सदर कामासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी सोबत वेळोवेळी बैठका घेऊन कामाच्या वस्तुस्थिती बाबत माहिती अवगत करण्यात आलेली आहे. मा.महासभेच्या ठरावानुसार ज्या इमारतीची कामे अर्धवट स्थितीत आहेत ती कामे मंजुर दराने कंत्राटदार यांच्याकडुन करुन घेण्यात यावीत. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. सदर वस्तुस्थिती सादर करण्यात येत आहे.

**(बालाजी खतगांवकर)**
**आयुक्त**
मिरा-भाईंदर महानगरपालिका